दै. सकाळ दि. २१०९।२०२२

# निघून गेलेल्या मुलाला काढले शोधून

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कामगिरी

### मिळाले यश; अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कामगिरी



नांदेड : पोलिस विभागातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने रागात निघून गेलेल्या मुलाला शोधून त्याच्या पालकांच्या स्वाधीन केले आहे. यावेळी पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर व इतर अधिकारी.

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाने मागील दीड वर्षांत अपहत किंवा हरवलेली आठ मुले आणि पाच मुली अशी १३ बालकांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले आहे. शहरात किंवा जिल्ह्यात संशयास्पदरित्या अथवा बेवारस लहान मुले, मुली फिरताना आढळून आल्यास पोलिस विभागाशी संपर्क साधावा.**
**– प्रमोदकुमार शेवाळे**, पोलिस अधीक्षक, नांदेड.

२० ...गाच्या ... गेलेल्या ... पोलिस ... ळे आहे. ... क प्रतिबंध ... सेलच्या ... वर्षांनंतर ... वडिलांच्या ... ला आहे. ... ली) येथोल ... (वय ४२) ... (वय १५) ...

सापडला नसल्याने बिलोली पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर पोलिस अधीक्षक कार्यालयातील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातर्फे या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला.

दरम्यान, या कक्षातर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा पोलिस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक निलेश मोरे, विजय कबाडे, पोलिस उपअधीक्षक (गृह) तथा कक्षाच्या प्रभारी डॉ. अश्विनी जगताप, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी घेतला. सदर प्रकरणी तपासाच्या दृष्टीने महिला पोलिस उपनिरीक्षक प्रियंका आघाव, पोलिस जमादार मारोती माने, अच्युत मोरे, महिला पोलिस नायक शीतल सोळंके यांनी माहिती घेतली असता तपासादरम्यान एक संशयास्पद मोबाईल क्रमांक मिळाला. त्यावर संपर्क साधला अशता सुरवातीस सदर मुलगा उडवाउडवीचे उत्तरे देत होता. स्वतःचे नाव सांगत नव्हता. परंतु त्यास विश्वासात घेऊन कौशल्यपुर्ण संभाषण केल्यानंतर त्याने स्वतःचे नाव सांगून औरंगाबादला असल्याचें सांगितले. त्यानंतर त्याचा शोध घेऊन त्याला वडिलांच्या स्वाधीन करण्यात आले असल्याची माहिती प्रभारी अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांनी दिली. यावेळी वडिलांनी पोलिस विभागाचे आभार मानले.

of Closing
दिनांक

e of
sing
दिनांक